जिल्हा परिषद, गोंदिया

जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, पतंगा मैदान, आमगाव रोड, फुलचुर गोंदिया

दुरध्वनी क्रं. ०७१८२-२३१५५४ Email : eebngondia@gmail.com

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. गोंदिया

जाहिरात

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. गोंदिया कार्यालयात सेवानिवृत्त (गट-अ) अभियांत्रिकी समन्वयक -०२ पदे यांची कंत्राटी नियुक्ती करार पध्दतीने (विहित कालमर्यादेसाठी) जलजीवन विषयांतर्गत कामांकरिता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डीसेबंर २०१६ व राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या दिनांक २८ ऑक्टोबंर २०२१ रोजी झालेल्या शिखर समितीचे मान्य इतीवृत्त अन्वये करावयाची आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी दि. 16 /०२/२०२२ ते दि. 23/०२/२०२२ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत आपले अर्ज व Resume सह, सेवानिवृत्ती आदेश,शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र,सेवेच्या कालावधीत कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित नसावी. किंवा कोणतीही शिक्षा झाली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.तसेच आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी.अर्जाच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक 28/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते ६.१५ या कालावधील होईल. विशेष उच्च शैक्षणिक अर्हता किंवा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद येथील कामकाजाचा अनुभवास प्राधान्य. वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्ष. सदर मुलाखतीकरिता कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही. मासिक परिश्रमिक शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे देय राहील.

(अनिल पाटील,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

(एस.एस. बेलपत्रे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, गोंदिया

टिप - सदर जाहीरातील अटी व शर्ती कार्यालयीन नोटीस बोर्डवर पाहावयास मिळतील.

करारपध्दतीने कंत्राटी सेवानिवृत्त (गट-अ) अभियांत्रिकी समन्वयक नियुकती पदासाठी अटी व शर्ती

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायीक कामात गुंतलेला नसावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध जाहीर करणे आवश्यक राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधी पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापण करतील.

७. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहित.

८. करारपध्दतीने नियुक्ती करतांना सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

(अनिल पाटील,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

(एस.एस. बेलपत्रे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, गोंदिया